दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-३०९ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, १ मे २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-





## नाल्यातून गाळ काढण्याच्या कामात कुचराई करणाऱ्या कंत्राटदारांवर पालिका प्रशासनाची दंडात्मक कारवाई

■ ठाणे, यश सावंत :

मुंबई, यश सावंत : पावसाळपूर्व नालेसफाईला सुरूवात झालेली असतानाच आता नालेसफाईतील कुचराईची प्रकरणेही समोर येऊ लागली आहेत. मोठ्या नाल्यातून गाळ काढण्याच्या कामांपैकी ३१ ठिकाणी कामात निष्काळजीपणा, त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. गोवंडीमध्ये कंत्राटदाराने नालेसफाईला सुरूवातच केलेली नसल्याचे आढळून आले आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून या वेगवेगळ्या कंत्राटदाराना मिळून एकूण ३० लाख ८३ हजार रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. मुंबईत दरवर्षी पावसाचे प्रत्यक्ष आगमन होण्यापूर्वी महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाच्या माध्यमातून मुंबई महानगरातील मोठ्या नाल्यांमधून गाळ काढला जातो. तर, विभाग कार्यालयांच्या पातळीवर लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे केली जातात. नाल्यांमधून गाळ काढल्याने पावसाळी पाण्याचा जलद गतीने निचरा होण्यास मदत होते. मुंबई महानगरातील पर्जन्यमान आणि पावसाची तीव्रता याबाबतचा अनुभव लक्षात घेऊन, नाल्यांमधून किती गाळ उपसणे आवश्यक आहे, याचा अभ्यास करून गाळ उपशाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येते. यंदा पावसाळ्यापूर्वी एकूण १० लाख २१ हजार ७८२ मेट्रिक टन गाळ काढण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. पैकी आतापर्यंत ६ लाख २३ हजार ६३१ मेट्रिक टन म्हणजे निर्धारित उद्दिष्टाच्या ६१.०३ टक्के गाळ काढण्यात आला आहे. मात्र काही ठिकाणी नालेसफाईच्या कामांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने संबंधित कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई केली आहे. प्रतिवर्षाप्रमाणे मार्चच्या पहिल्या आठवड्यात यंदाही नाल्यांतून गाळ काढण्याची कामे वेगाने सुरू करण्यात आली. या कामांवर प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी यंत्रणेला दिले आहेत. शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरातील मोठ्या नाल्यांतून गाळ काढण्याच्या कामांची पाहणी व तपासणी दरम्यान कामामध्ये त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे एकूण ३१ ठिकाणी कंत्राटदारांना दंड ठोठाविण्यात आला असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कामातील त्रुटीनुसार दंड रक्कम निश्चित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या देय रकमेतून सदर दंडाची रक्कम कापून घेण्यात येणार आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. दिनांक २७ एप्रिल रोजी करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान गोवंडी येथील डम्पिंग नाला या नाल्यातील गाळ काढण्याच्या कामास सुरुवात न केल्याने कंत्राटदार डी बी इन्फ्रास्ट्रक्चर यांना रुपये एक लाख दंड लावण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## 'डायनासोर'प्रमाणे 'काँग्रेस' पृथ्वीवरुन नाहीशी होईल
### केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची काँग्रेसवर जोरदार टीका



■नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पुन्हा एकदा काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ज्याप्रमाणे डायनासोर पृथ्वीवरून नाहीसे झाले, त्याचप्रमाणे काही दिवसांत काँग्रेसही पृथ्वीवरून नाहीशी होईल, असं म्हणत खोचक टोला लगावला आहे.

मध्य प्रदेशातील खांडवा येथे निवडणूक रॅलीला संबोधित करताना राजनाथ सिंह यांनी काही वर्षांनी मुलं विचारतील कोण काँग्रेस? असं म्हटलं आहे. खांडवा येथील निवडणूक रॅलीला संबोधित करताना केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, ''पंडित जवाहरलाल नेहरू म्हणत होते की, आमचं सरकार स्थापन झालं तर देशातून गरिबी दूर करू. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग यांनीही सांगितलं होतं. पण गरिबी कोणीही दूर केली नाही, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २५ कोटींहून अधिक लोकांना गरिबीतून बाहेर काढलं आहे.'' राजनाथ सिंह यांनी अनेक मुद्द्यांवरून काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं आहे. सूरत आणि इंदूरचा उल्लेख करून ते म्हणाले की, ''एक चमत्कार घडला आहे, काँग्रेसचे उमेदवार भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. याआधीही लोकसभा निवडणुकीत २० वेळा उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचं त्यांनी उपरोधिकपणे सांगितलं. पण तेव्हा लोकशाही धोक्यात आली नाही.''

''भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले तर लोकशाही धोक्यात आल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे. काँग्रेस हे बुडणारे जहाज असून जगातील कोणतीही शक्ती त्यांना बुडण्यापासून वाचवू शकत नाही. आता काँग्रेसला घालवायचं हे जनतेने ठरवलं आहे'', असंही राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

## ''मोदींनी शरद पवार साहेबांना भटकती आत्मा म्हणणे हे अजित पवारांना पटते का?'' : जितेंद्र आव्हाड



■ ठाणे, विशाल कारंडे:

महाराष्ट्र एका भटकत्या आत्म्याचा शिकार झाले आहे. त्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळे महाराष्ट्र अस्थिर झाला आहे अशी टीका देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील जाहीर सभेत केली. या टीकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आक्रमक झाले आहे.

बारामतीमध्ये अजित पवार यांनी जे भाषण केले होते; त्यामध्येही ते असेच म्हणाले होते की,''यांचे शेवटचे भाषण कधी होणार; हेच कळत नाही.'' मोदीही असेच काहिसे बोलून गेले. ते पवारसाहेबांच्या मृत्युची वाट पहात नाहीत ना? 'मोदींनी शरद पवार साहेबांना भटकती आत्मा म्हणणे', हे पटते का, याचे स्पष्टीकरण अजित पावर आणि त्यांच्या राष्ट्रवादीने द्यावे असे आव्हाड म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुण्यात सभा झाली. भटकत्या आत्म्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे महाराष्ट्र अस्थिर झाला आहे. ४५ वर्षांपूर्वी या खेळाला सुरूवात झाली. ज्या लोकांची स्वप्न पूर्ण होत नाही. अशी माणसे दुसऱ्यांची स्वप्ने पूर्ण होऊ देत नाहीत. असे भटकते आत्मे दुसऱ्याची स्वप्ने बिघडवितात. काही मुख्यमंत्र्यांना कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. विरोधकांबरोबच देश, राज्य, पक्ष आणि कुटुंब या आत्म्याने अस्थिर केले. भाजपचे सरकार पाडण्याचे प्रयत्न या आत्म्याने केले असे मोदी या सभेत म्हणाले होते. या टीकेवरून आता शरद पवार यांची राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टोला लगावला आहे.

पवारसाहेब यांना एवढं घाबरायचे कारण काय? संपूर्ण भाजपने आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने, 'मोदींनी शरद पवार साहेब यांना भटकती आत्मा म्हणणे', हे पटते का, याचे स्पष्टीकरण द्यावे , खासकरून अजित पवार यांनी! मराठी माणसे ''भटकता आत्मा'' कशाला म्हणतात, हे मतदानात दाखवून देतील अशी टीकाही त्यांनी अजित पवार यांच्यावर केली.

## धक्कादायक! भांडुपमध्ये टॉर्च लावून गर्भवतीची प्रसूती, आईसह बाळाचा मृत्यू




■भांडूप, विशाल पाटील:

आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे काढणारी अत्यंत भयंकर घटना मुंबईच्या भांडुपमधील पालिकेच्या रुग्णालयात घडली आहे. भांडुपच्या सुषमा सुराज पालिका प्रसूतीगृहामध्ये टॉर्चच्या उजेडामध्ये महिलेची प्रसूती करण्यात आली. गर्भवती महिलेची प्रसूती करत असताना नवजात शिशूचा मृत्यू झाला. त्यानंतर बाळाच्या आईची देखील प्रकृती गंभीर झाली. या महिलेचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर महिलेच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त करत रुग्णालयात गोंधळ घातला. मिळालेल्या माहितीनुसार, भांडुपच्या सुषमा सुराज पालिका प्रसूतीगृहामध्ये प्रसुतीसाठी एका महिलेला दाखल करण्यात आले होते. महिलेची प्रसूती करत असताना अचानक लाईट गेली. त्यामुळे डॉक्टरांनी चक्क लाईट लावून महिलेची प्रसूती केली. सिझर करत असताना नवजात शिशूचा मृत्यू झाला. त्यानंतर जास्त रस्तस्राव होऊ लागल्यामुळे महिलेची प्रकृती गंभीर झाली. त्यामुळे तिला देखील सायन रुग्णालयात हलवण्यात आले. सायन रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना या महिलेचा देखील मृत्यू झाला. त्यामुळे महिलेच्या कुटुंबियांनी संपात व्यक्त करत रुग्णालयामध्ये गोंधळ घालत डॉक्टरांना जाब विचारला. तर डॉक्टरांनी उडवा उडवीची उत्तरं दिली असल्याचा आरोप महिलेच्या कुटुंबीयांनी केला आहे. ईशान्य मुंबई उपनगरातील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नवजात शिशूचा मृत्यू झाल्याची ही पहिलीच घटना नाही. त्यामुळे या भागात आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजल्याचे दिसून येत आहे. संबंधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## ''भाजपा नेत्यांना मराठ्यांचा द्वेष, म्हणूनच पीएम मोदींना इतक्या सभा घ्याव्या लागतात'' : मनोज जरांगे

■ जालना, सचिन कदम:

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःच्या पक्षाच्या चिन्हा शिवाय दुसऱ्या कोणत्याही चिन्हाचा प्रचार कधीही केला नव्हता. परंतु महाराष्ट्रातील स्थानिक पदाधिकाऱ्यांमुळे त्यांच्यावर ही वेळ आली आहे.

८८ जागा असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये मतदान एका टप्प्यात आहे. मात्र महाराष्ट्रात ४८ जागा असताना पाच टप्प्यात मतदान घेऊन ठिकठिकाणी स्वतः पंतप्रधान व गृहमंत्री अमित शहा यांना सभा घ्याव्या लागत आहेत. हा सत्ताधाऱ्यांचा पराभव असून मराठा एकजुटीचा विजय आहे, अशी टीका मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मीडियाशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाला कुणाला पाडा किंवा कुणाला विजयी करा, असे सांगितले नाही. ज्याला पाडायचे त्याला असे पाडा की त्याला मराठा समाजाची ताकद दिसली पाहिजे असे म्हटल आहे. मराठा समाजाने पाडायचे शिकले पाहिजे, असे मत जरांगे पाटील यांनी व्यक्त




केले. लोकसभा निवडणुकीनंतर सगेसोयरे कायदेशीर अंमलबजावणी न केल्यास यापेक्षाही बिकट परिस्थितीचा सामना सत्ताधाऱ्यांना करावा लागेल. मराठा समाजाने एक महिन्यापूर्वीच विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ही भोगायची वेळ फक्त स्थानिक नेत्यांमुळे मोदींवर आली आहे. आव्हान तर त्यांच्यापुढे उभे राहिले आहे. उमेदवार उभे करण्यापेक्षा पाडण्यात खूप मोठा विजय आहे.

स्वतःची मुले आणि आरक्षण डोळ्यासमोर ठेऊन मराठा समाजाने यावेळेस ताकदीने काम करायचे आहे. एक गोष्ट खरी आहे, मोदींना महाराष्ट्रात इतक्या सभा घेण्याची कधी गरज पडली नाही. मी म्हटले होते की, मराठ्यांना खेटू नका. तीच चूक त्यांचे स्थानिक नेते करत आहेत. माज्या गोरगरीब मराठा लेकरांवर गुन्हे दखल केले. काहीही नसताना गुन्हे दखल करण्यात आले. आरक्षण असून दिल नाही. ही भोगायची वेळ फक्त स्थानिक नेत्यांमुळे मोदींवर आली आहे, या शब्दांत मनोज जरांगे यांनी हल्लाबोल केला. दरम्यान, आम्ही कोणालाही पाठिंबा दिलेला नाही. कोण येत आणि कोण जाते हे माझ्या दृष्टीने महत्वाचे नाही. पाहिल्यासारखे मराठे आता राहिले नाही. आता फायदा घेऊ देत नाहीत. मी घेऊ देत नाही तर मराठे कसे घेऊ देतील. कोणाला पाडायचे आणि कोणाला निवडून द्यायचे हे समाज योग्यरित्या ठरवेल, असे मनोज जरांगे म्हणाले.

## वसंत मोरेंना निवडणूक चिन्ह मिळताच विरोधकांना दिला थेट इशारा

■ पुणे, अभिजित येरल्लू:

लोकसभा निवडणुकीमध्ये पुण्यातून वंचित बहुजन आघाडीकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या वसंत मोरे यांना आज निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. वसंत मोरे यांना 'रोड रोलर' हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. आज निवडणूक आयोगाकडून वसंत मोरे यांना निवडणूक लढवण्यासाठी चिन्ह बहाल करण्यात आले.

निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर वसंत मोरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत विरोधकांना इशारा दिला आहे. त्यांची ही सोशल मीडिया पोस्ट व्हायरल होत आहे. मनसेला जय महाराष्ट्र करत वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केलेले वसंत मोरे हे लोकसभा निवडणुकीसाठी पुणे लोकसभा मतदार संघातून उभे राहिले आहेत. वसंत




मोरे यांना आज रोड रोलर हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे.

रोड रोलरच्या माध्यमातून वसंत मोरे हे लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. वसंत मोरे यांनी निवडणूक चिन्हाचा फोटो आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवर पोस्ट केला आहे. वसंत मोरे यांनी एक्सवर निवडणूक चिन्हाची पोस्ट शेअर केली आहे. रोड रोलर निवडणूक चिन्हाच्या फोटोवर 'पुण्याची पसंत मोरे वसंत...' असे लिहिले आहे. त्यांनी ही पोस्ट शेअर करत कॅप्शनमध्ये 'पुण्यात आता वसंत (तात्या) मोरे यांचा विकासाचा रोडरोलर प्रस्थापितांची झोप उडवणार...' असे लिहिले आहे. या पोस्टच्या माध्यमातून वसंत मोरे यांनी विरोधकांना थेट इशारा दिला आहे.

दरम्यान, पुण्यात लोकसभा निवडणुकीमध्ये तिहेरी लढत होणार आहे. महायुतीकडून माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे नेते रविंद्र धंगेकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उभे करण्यात आले आहे. तर वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत.

## गंगापूर धरणात दूषित पाण्यामुळे प्रदूषण! नाशिककरांच्या आरोग्यास धोका... प्रशासनाचे दुर्लक्ष

■ नाशिक, नितीन देवळेकर :

गंगापूर धरणामध्ये अलीकडच्या काळात पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले आहे. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून मोठा गाजावाजा करून सुरू केलेल्या बोट क्लब परिसरातही काही भागांमध्ये दूषित पाणी साचलेले आहे. हे पाणी ड्रेनेजमुळे दूषित झाले की दुसरे काही कारण आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. थेट गंगापूर धरणातच दूषित पाणी जात असल्याने नाशिककरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

गंगापूर धरण हे नाशिक शहराला पाणीपुरवठा करणारे प्रमुख धरण आहे. या धरणाद्वारेच होणारा पाण्याचा विसर्ग दुसऱ्या जिल्ह्यांमध्येही जातो. गेल्या काही




वर्षांपासून गंगापूर धरणामध्ये पर्यटनाचा नावाखाली अनेक गैरप्रकार झाल्याचे सांगितले जात आहे. अतिउत्साही पर्यटकांमुळे संपूर्ण गंगापूर धरणाच्या किनाऱ्यावर जवळपास सर्वच बाजूने दारूच्या बाटल्या, प्लास्टिक, बियरचे टीन मोठ्या प्रमाणात बघावयास मिळतात.

सध्या धरण परिसरात पाणी कमी आहे, त्यामुळे येथे दूषित पाणी साचल्याचे लगेच लक्षात येते. धरण पूर्णपणे भरलेले असते तेव्हा त्याच्या खालून किती दूषित पाणी धरणाच्या पाण्यामध्ये जात असेल याचा अंदाजही येऊ शकत नाही. गंगापूर धरण परिसरात दूषित झालेलं हिरव्या रंगाचे पाणी व तेलाचा तवंग अगोदरही दिसला होता. तरी जलसंपदा विभागाने तातडीने धरणामध्ये येणाऱ्या दूषित पाण्याचा स्त्रोत शोधून तो तातडीने बंद करून दोषींवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

शहराला गंगापूर, दारणा व मुकणे धरणातून पाणीपुरवठा होतो. गंगापूर धरणातून जवळपास ६० टक्क्यांहून अधिक टक्के शहराला पाणीपुरवठा होतो. एकलहरे थर्मल पॉवर स्टेशन, एमआयडीसी तसेच गंगापूर कालव्यातून तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा होतो.

अशाप्रकारचे दूषित पाणी नदी-नाल्यांमध्ये मिसळले तर अनेक नागरिकांचे आरोग्य बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन दरबारी एकीकडे स्वच्छतेसाठी मोहीम आखली जात असताना, गंगापूर धरणाच्या पाण्यात मात्र वारंवार होणाऱ्या प्रदूषणामुळे संशय व्यक्त होत आहे.

## डोंबिवलीतील सोनारपाडा येथील महारेरा गुन्ह्यातील इमारत जमीनदोस्त... या इमारतींचा पाडकाम खर्च माफियांकडून वसूल केला जाणार



■ ठाणे, रोहित जैसवाल :

डोंबिवली पूर्वेतील शिळफाटा रस्त्या लगतच्या २७ गावातील सोनारपाडा गावातील अतिशय अडचणीच्या ठिकाणी उभारण्यात आलेली महारेरा गुन्ह्यातील एक बेकायदा इमारत ई-प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार आणि त्यांच्या पथकाने गेल्या महिनाभर अथक मेहनत घेऊन शक्तिमान कापकाम यंत्र, जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केली.

सोनारपाडा मधील भूमाफिया किशोर म्हात्रे यांनी ही पाच माळ्याची इमारत पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता, या इमारतीला पोहच रस्ता उपलब्ध नसताना उभारली होती. या बेकायदा इमारतीला माफिया किशोर म्हात्रे यांनी महारेराचे नोंदणी क्रमांक मिळवून या इमारती मधील सदनिका ग्राहकांना विकण्याची तयारी केली होती. एल आकाराच्या असलेल्या या बेकायदा इमारतीच्या एका बाजुने उच्च दाबाच्या वीज वाहिन्या गेल्या होत्या. त्यामुळे ही इमारत तोडणे मोठे आव्हान ई प्रभागाचे साहाय्यक आयुक्त पवार यांच्या समोर होते.

गेल्या महिन्यापासून ही बेकायदा इमारत कामगारांच्या साहाय्याने, नंतर जेसीबी आणि त्यानंतर शक्तिमान कापकाम यंत्र यांचा वापर करून तोडण्यास सुरूवात केली होती. सोमवारी ही इमारत जमीनदोस्त करण्यात आली. या इमारती लगतच्या काही इमारतींना धोका असल्याने तेथील रहिवाशांना काही दिवस बाजुला राहण्यास सांगण्यात आले होते. या इमारतीचा पाडकाम खर्च माफियांकडून वसूल केला जाणार आहे.

ज्या भूमाफियांनी पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता बेकायदा इमारती उभारल्या आहेत. अशा इमारतींना माफियांनी महारेराचे नोंदणी प्रमाणपत्र मिळविले आहे. अशा इमारती भुईसपाट करण्याची करावी असे आदेश वास्तुविशारद संदीप पाटील यांच्या याचिकेवरून मुंबई उच्च न्यायालयाने कल्याण डोंबिवली पालिकेला दिले आहेत. याप्रकरणी रामनगर, मानपाडा पोलीस ठाण्यात ६५ बेकायदा इमारतीशी सुमारे ३५० जणांवर गुन्हे दाखल आहेत.

न्यायालयाच्या आदेशावरून आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशावरून महारेरा गुन्ह्यातील इमारती भुईसपाट करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. साहाय्यक आयुक्त ही कामगिरी पार पाडत आहेत. आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी किशोर म्हात्रे यांची इमारत जमीनदोस्त केली. डोंबिवलीतील शिवमंदिर रस्त्यावरील स्मशानभूमी जवळील महारेरा गुन्ह्यातील एक बेकायदा इमारत ग प्रभागाने पावसाळ्यापूर्वी जमीनदोस्त करण्याची नागरिकांची मागणी आहे.

## १० लाख रुपयांपर्यंत जप्त रक्कम प्रकरणी त्रिसदस्यीय समिती स्थापन

■ मुंबई, दिगंबर जाधव :

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर निवडणूक आयोगाकडून देखरेख ठेवण्यात येत आहे. त्यासाठी लोकसभा मतदारसंघातील विधानसभा क्षेत्रात नियुक्त केलेल्या विविध पथकांकडून व पोलिस पथकांनी केलेल्या कार्यवाहीमध्ये १० लाख रुपयांपर्यंतची प्रकरणे जलद गतीने सोडवण्यासाठी व याबाबत निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. यासाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी त्रिसदस्यीय रोख रक्कम सोडवणूक समिती (कॅश रिलीज कमिटी) गठित केली आहे.

या रकमेच्या मर्यादेत जप्त केलेल्या प्रकरणांमध्ये संबंधितांना या समितीकडे दाद मागता येणार आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार खर्च नियंत्रण विषयांतर्गत रोख रक्कम सोडवणूककरिता ही समिती गठित करण्यात आली आहे. त्यामध्ये सहआयुक्त अंबरनाथ खुले हे अध्यक्ष तर सहायक आयुक्त विश्वास मोटे आणि अधिदान व लेखाधिकारी विलास गांगुर्डे हे सदस्य असणार आहेत. तर त्रिसदस्यीय समितीचे कार्यालय हे महसूल भवन सभागृह, गुरुनानक रुग्णालयाच्या पाठीमागे, वांद्रे (पूर्व) येथे असणार आहे.

## बालाजी मंदिर सीआरझेड मंजुरीप्रकरणी एनजीटीची केंद्रीय वने-पर्यावरण मंत्रालयाला नोटीस

■ नवी मुंबई, भावना जैन:

एनजीटी अर्थात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने नवी मुंबईतील उलवेतील तिरुपती व्यंकटेश्वर स्वामी मंदिरासाठी दिलेल्या सीआरझेड मंजुरीला आव्हान देणारा शहरस्थित पर्यावरणवाद्यांचा अर्ज अखेर स्वीकारला आहे.

एनजीटीच्या पश्चिम विभागीय खंडपीठाचे न्यायिक सदस्य म्हणून न्यायमूर्ती दिनेश कुमार आणि तज्ञ सदस्य म्हणून डॉ. विजय कुलकर्णी यांनी याप्रकरणी आता केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला चार आठवड्यांत उत्तर देण्यासाठी नोटीस बजावली आहे. एनजीटीत नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी असा युक्तिवाद केला की, १० एकर भूखंडांचे वाटप आणि सीआरझेड प्राधिकरणाने दिलेली मंजुरी बेकायदेशीर आहे. कारण जमीन मंदिराचा भूखंड सीआरझेड-१ मध्ये मोडतो. तरीही



महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने चुकीच्या पद्धतीने सीआरझेड मंजुरी दिली आहे. वास्तविक त्यासाठी केंद्रे वने आणि पर्यावरण मंत्रालयाकडे अर्ज करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने भूखंडाच्या सीआरझेड नसलेल्या भागात बांधकामाला परवानगी दिली असली तरी सीआरझेड-१ क्षेत्राच्या ५० मीटर खारफुटीच्या बफर झोनमध्येही कंपाउंड वॉल आणि लॉनला परवानगी दिल्याने नॅटकनेक्टने त्याला विरोध केला आहे. यावर कुमार यांच्या वकील रोनिता भट्टाचार्य यांच्या युक्तिवादाची दखल घेऊन एनजीटी खंडपीठाने अर्ज स्वीकारून पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी ठेवली आहे.

यावेळी एनजीटी खंडपीठाने भट्टाचार्य यांना एमसीझेडएमए प्रतिज्ञापत्राला उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांचा अवधी दिला, तर तिरुमाला तिरुपती देवस्थानचे वकील सत्य सभरवाल यांना या खटल्यात त्यांचा जबाब नोंदविण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्यावर्षी जूनमध्ये या मंदिराचे भूमिपूजन केले होते.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.



**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या.

एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे. जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.



सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत. तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.



जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात** ▮खाज सुटणे ▮अतिसार ▮डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे ▮श्वास घ्यायला त्रास होणे ▮हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

▮जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे. ▮बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्स असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?
## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.



**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे अँटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, अँटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

# ५ पिढ्यांनी पाळलेलं वचन! मामाच्या गावी पोहोचली प्राजक्ता माळी... दाखवली कावड परंपरा




मराठी सिनेसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक असणारी अभिनेत्री म्हणजे प्राजक्ता माळी. प्राजक्ताने आपल्या अभिनयासोबतच आपल्या सौंदर्याने देखील प्रेक्षकांना आपलंसं केलं. तीन अनेक मालिका, चित्रपटातून प्रेक्षकांची मनं जिंकली. प्राजक्ताने सिनेसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. ती अभिनयासोबतच व्यवसायदेखील पाहते. ती सोशल मीडियावरही प्रचंड सक्रीय असते. स्वतःचे हटके फोटो आणि व्हिडिओ ती चाहत्यांसोबत शेअर करत असते. अशातच तिने तिचा का व्हिडिओ शेअर केला आहे ज्यात ती मामाच्या गावाची परंपरा दाखवताना दिसतेय.

प्राजक्ता आपल्या बिझी शेड्युलमधून वेळ काढून आपल्या कुटुंबियांसोबत मजा करताना दिसते. ती कायमच आपल्या कुटुंबाला प्राधान्य देताना दिसते. नुकतीच ती तिच्या मामाच्या गावी गेली होती. पंढरपूर येथील भाळवणी हे प्राजक्ताचं आजोळ. या गावात वर्षानुवर्षे एक परंपरा सुरू आहे ती म्हणजे कावड. या कावडीला खांदा द्यायला अनेक समाजातील माणसं एकत्र येतात. याचे काही फोटो आणि व्हिडिओ तिने एका रीलमध्ये शेअर केले आहेत. या रिलमध्ये ती गावातील वयस्कर माणसांसोबत गप्पा मारताना दिसतेय. तर बकरीच्या पिल्ल्यासोबत खेळताना दिसतेय. हा व्हिडिओ शेअर करत तिने लिहिलं, 'मामाच्या गावाला जाऊया... #भाळवणी #पंढरपूर #देवदर्शन. २ मित्र मैत्रीत एकमेकांना वचन देतात, 'आपण नाही राहिलो तरी जोवर चंद्र-सुर्य आहेत तोवर आपली मैत्रीची आठवण राहील. ही कावड चालू राहील. तुझ्या समाजातील भांडण सोडवायला माझा समाज धावेल, माझ्या समाजातील अडचणी तूझा समाज सोडवेल. इथून पुढे एकमेकांच्या पाठीशी दोन्ही बाजू खंबीरपणे उभ्या राहतील.'

पुढे तिने लिहिलं, 'आणि त्यांनी दिलेलं वचन हे गावकरी गेली ५-६ पिढ्या निगुतीनं पाळतायेत; ही कावड आजही चालू आहे आणि दोन समाजांमधील प्रेम अबाधित आहे. सगळी कामं बाजूला ठेवून सगळे कावडीला खांदा द्यायला सगळे धावून येतात.' प्राजक्ताचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय. त्यावर नेटकऱ्यांनी तिचं कौतूकही केलं आहे. प्राजक्ता सध्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करताना दिसतेय.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ७०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 6 | | 9 | 3 | | | 4 |
| 4 | 7 | | | | | | | 9 |
| | | 2 | | 4 | 8 | | 6 | |
| 6 | 1 | 5 | | | | | | 3 |
| | | | | | 4 | | | |
| 8 | | | 5 | | | 9 | | |
| | | 3 | 2 | | | 7 | | 6 |
| 1 | | | | | | 8 | | |
| | 4 | | | 7 | | 1 | | |

## उत्तर सुडोकू -६९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 8 | 3 | 1 | 2 | 4 | 5 | 9 |
| 2 | 9 | 1 | 8 | 4 | 5 | 6 | 7 | 3 |
| 3 | 5 | 4 | 9 | 6 | 7 | 8 | 1 | 2 |
| 8 | 3 | 5 | 1 | 9 | 4 | 2 | 6 | 7 |
| 1 | 4 | 7 | 2 | 3 | 6 | 9 | 8 | 5 |
| 9 | 6 | 2 | 7 | 5 | 8 | 3 | 4 | 1 |
| 4 | 1 | 3 | 5 | 8 | 9 | 7 | 2 | 6 |
| 5 | 2 | 6 | 4 | 7 | 3 | 1 | 9 | 8 |
| 7 | 8 | 9 | 6 | 2 | 1 | 5 | 3 | 4 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# 'प्रसिद्धीची भूक, विकृत चाळे'
## डान्सवरून बोलणाऱ्याला मराठी अभिनेत्रीचं सडेतोड उत्तर




सध्या सोशल मीडियाचं जग आहे. प्रत्येकाच्या हातात फोन आहे. मात्र काही लोक फोनवरील सोशल मीडिया या माध्यमाचा वापर हा सातत्याने दुसऱ्यांच्या चुका दाखवण्यासाठी करतात. त्यात कलाकारांना तर बिनधास्त बोल लावले जातात. छोट्या पडद्यावरील कलाकार असो किंवा मोठ्या, कधीकधी काहीही कारण नसताना कलाकारांना ट्रोल केलं जातं. काही कलाकार यावर शांत राहणं पसंत करतात तर काही मात्र सडेतोड उत्तर देत समोरच्याची बोलती बंद करतात. त्यातील एक बिनधास्त अभिनेत्री म्हणजे हेमांगी कवी. हेमांगी कायमच आपली मतं स्पष्टपणे मांडताना दिसते. एक बेधडक अभिनेत्री म्हणून तिची ओळख आहे. कुणालाही सडेतोड उत्तर देताना ती मागेपुढे पाहत नाही. नुकतंच तिने तिच्या बोलण्याने समोरच्याला गार केलं आहे. डान्सवरून ट्रोल करणाऱ्याला हेमांगीने चांगलंच सुनावलं आहे.

हेमांगी कवी सोशल मीडियावर कायम चर्चेत असते. सोशल मीडियाद्वारे ती तिचे फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. हेमांगीने नुकतंच दीक्षा सोनलकर या अभिनेत्रीबरोबर 'यिम्मी यिम्मी' या गाण्यावर रील व्हिडीओ केला होता. यामध्ये त्या एका विशिष्ट डान्स स्टेपवर नाचताना पाहायला मिळत आहेत. सोमवारी(२९ एप्रिल) आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त हा व्हिडीओ तिने शेअर केला होता. या व्हिडीओवर अनेकांनी लाइक व कमेंटचा पाऊस पाडला. मात्र या व्हिडीओवर एका नेटकऱ्याने 'विकृत चाळे, प्रसिद्धीची भूक' असं म्हणत प्रतिक्रिया दिली आहे. मात्र हेमांगीने देखील त्या युजरला त्याच्याच शब्दात उत्तर दिलं आहे. तिने त्याची कमेंट स्टोरीला शेअर केली आणि उत्तर देत लिहिलं, 'आम्हाला प्रसिद्धीची काहीही गरज नाही लांडगेदादा, आम्ही आधीपासूनच प्रसिद्ध आहोत'.

# दिनविशेष

## १ मे

- १७०७: किंगडम ऑफ इंग्लंड व किंगडम ऑफ स्कॉटलंड मिळून किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन बनवण्यात आले.
- १७३९: चिमाजी अप्पाने पोतुर्गीजांच्या ताब्यात असलेल्या वसईवर निकराचा हल्ला केला. तीन महिन्याच्या युद्धानंतर वसई मराठ्यांच्या ताब्यात आली.
- १८४०: द पेनी ब्लॅक हे पहीले अधिकृत पोस्टेज स्टॅम्प युनायटेड किंगडममध्ये जारी केले गेले.
- १८४४: हाँगकाँग पोलिस फोर्स हे जगातील दुसरे आणि आशियातील पहिले आधुनिक पोलिस दल स्थापन झाले.
- १८८२: आर्य महिला समाजा ची पं. रमाबाई यांच्या पुढाकाराने पुणे येथे स्थापना झाली.
- १८८४: अमेरिकेत कामगारांना एका दिवसात ८ तास कामकाज असावे ह्या मागणीची घोषणा.
- १८८६: आंतरराष्ट्रीय कामगार दिन हा कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय संघटनेच्या दुर्सया बैठकीत पहिल्यांदा साजरा केला.
- १८९०: जागतिक कामगार दिन हा जगात पहिल्यांदा साजरा केला.
- १८९७: रामकृष्ण मिशन ची सुरूवात स्वामी विवेकानंद यांनी केली.
- १९२७: जागतिक कामगार दिन हा भारतात पहिल्यांदा साजरा केला.
- १९३०: सूर्यमालेतील नवव्या ग्रहाचे प्लुटो असे नामकरण करण्यात आले.
- १९४०: युद्ध सुरू असल्यामुळे ऑलिम्पिक स्पर्धा रद्द करण्यात आल्या.
- १९६०: मुंबईसह मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य आणि गुजरात या स्वतंत्र राज्यांचा निर्माण झाला.
- १९६०: गुजरात उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
- १९६१: क्युबाचे पंतप्रधान फिदेल कॅस्ट्रो यांनी क्यूबा देश समाजवादी राष्ट्र घोषित करून निवडणुका रद्द केल्या.
- १९६२: महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची स्थापना.
- १९७८: जपान चे नामी उमुरा हे एकटे उत्तर ध्रुवावर पोहोचणारे पहिले मनुष्य आहेत.
- १९८३: अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली.
- १९९८: पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते कोकण रेल्वे प्रकल्प राष्ट्राला अर्पण करण्यात आला.
- १९९९: नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची मुदत एक वर्षावरून अडीच वर्षांपर्यंत वाढवण्यासाठी सुधारणा करणारा अध्यादेश जारी झाला.
- २००९: स्वीडन मध्ये समलिंगी विवाह अधिकृत करण्यात आला.
- १२१८: जर्मनीचा राजा रुडॉल्फ (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: १५ जुलै १२९१)
- १९१३: अभिनेता बलराज साहनी यांचा जन्म. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
- १९१५: हिन्दी साहित्यिक डॉ. रामेश्वर शुक्ल उर्फ अंचल यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १९९५)
- १९१९: भारतीय भाषेतील प्रतिभासंपन्न पार्श्वगायक मन्ना डे यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर २०१३)
- १९२२: स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार आणि समाजवादी नेते मधु लिमये यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी १९९५)
- १९३२: कर्नाटकचे १६ वे मुख्यमंत्री आणि केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. एम. कृष्णा यांचा जन्म.

# भविष्य

**मेष** तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वर्गाला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

**वृषभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

**मिथुन** मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

**कर्क** मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळवे.

**सिंह** जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

**कन्या** पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

**तुला** पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

**वृश्चिक** बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खचार्चे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

**धनु** रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

**मकर** सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवगार्पासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळ.

**कुंभ** मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

**मीन** वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# काँग्रेसचे मुस्लीम लांगुलचालन!

सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये एकमेकांना उघडे पाडण्याची जणू काही स्पर्धाच लागलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसची पोलखोल करताना काँग्रेस हा पक्ष कसा मुस्लीमधार्जिणा आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी २००६ सालचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या भाषणाचा संदर्भ देऊन त्यात या देशाच्या संपत्तीवर अल्पसंख्याक आणि मुस्लिमांचा पहिला हक्क आहे, असे सिंग म्हणत असल्याचे दाखवून दिले. या देशातील राजकारण हे प्रामुख्याने हिंदू आणि मुस्लीम या दोन ध्रुवांभोवती फिरत आले आहे. इतकेच नव्हे तर ते फिरत ठेवण्यात येते. खरेतर १९४७ साली भारताची फाळणी झाल्यावर हे थांबायला हवे होते. कारण मुस्लिमांसाठी वेगळा पाकिस्तान मिळाला होता. देशाची फाळणी झाल्यानंतर बहुतांश काळ देशावर काँग्रेसची बहुमताची सत्ता होती. त्यामुळे नेहरू आणि गांधी म्हणतील तीच पूर्व दिशा अशीच स्थिती होती. जे मुस्लीम भारतात राहिले ते स्वखुशीने राहिले होते. जे इथे राहिले त्यांनी हिंदुस्थानच्या मुख्य प्रवाहात मिसळून जायला हवे होते. पाकिस्तानी लोक भारताला हिंदुस्थान असेच संबोधतात. हिंदूंसाठी हिंदुस्थान आणि मुस्लिमांसाठी पाकिस्तान या तत्त्वावर या देशाची फाळणी झाली होती. त्यामुळे या देशात राहणार्‍या मुस्लिमांनी भारतीय संविधानाच्या अधिन राहून इथले नियम पाळणे आणि स्वतःची प्रगती करून घेणे अपेक्षित होते.बहुतांश काळ सत्तेत असलेल्या काँग्रेसने भारतात राहणार्‍या मुस्लिमांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासावर भर देणे अपेक्षित होते. मुस्लीम मोठ्या संख्येने ज्या मदरशांमध्ये शिकतात त्यांचे आधुनिकीकरण करून तिथे आधुनिक शिक्षण द्यायला हवे होते. तसे व्यापकतेने झाले नाही. कारण आमच्या धार्मिक बाबतीत सरकारने हस्तक्षेप करायचा नाही, अशी जी मुस्लिमांची भूमिका होती त्याला सत्तेत असलेले काँग्रेसचे नेते वचकून होते. त्यामुळे मुस्लिमांच्या भावना दुखावणार नाहीत याची त्यांनी नेहमीच काळजी घेतली. हम सब हिंदू हैं यावरून हम सब हिंदी हैं, यावरून हम सब भारतीय हैं, असा बदल काँग्रेसने घडवला. याला कारण एकच होते की हिंदू, हिंदी हा शब्द मुस्लिमांना आवडत नव्हता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनमोहन सिंग यांच्या जुन्या भाषणाचा संदर्भ देत काँग्रेसची सत्ता आली तर ते देशाची संपत्ती कशी मुस्लिमांना वाटून टाकतील हे सांगून लोकसभा निवडणुकीत नक्कीच मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न केला, पण अशा प्रकारे मुस्लिमांचे लांगुलचालन करणारे सिंग हे काही पहिलेच काँग्रेसी पंतप्रधान नाहीत. मोदींसारख्या पंतप्रधानपदी असलेल्या व्यक्तीने असे विधान करणे चुकीचे असले तरी वास्तव लपवता येणार नाही. कारण काँग्रेसच्या नेत्यांनी सुरुवातीपासून मुस्लीम लांगुलचालनाची भूमिका घेऊन त्यातून त्यांच्या धार्मिक भावना फुलवत ठेवल्या. त्यातून त्यांना समाधान कसे वाटेल हे पाहण्यात आले, पण काँग्रेसने जर मोठ्या प्रमाणात मुस्लिमांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी मनापासून प्रयत्न केले असते, तर मोदींना त्यांच्यावर अशी टीका करण्याची संधी मिळालीच नसती.भारताची फाळणी हीदेखील काँग्रेसच्या मुस्लीम लांगुलचालनामुळेच झाली. जर त्यांनी कठोर भूमिका घेतली असती तर देशाची फाळणी झाली नसती. अब्राहम लिंकन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना देशाच्या दोन भागात मोठे यादवी युद्ध सुरू होते. देश फाळणीच्या उंबरठ्यावर होता. त्यावेळी राष्ट्राध्यक्ष लिंकन यांनी ठाम भूमिका घेऊन या देशाची कुठल्याही परिस्थितीत मी फाळणी होऊ देणार नाही, असे सगळ्यांना बजावले म्हणून तो देश अखंड राहिला. भारताच्या स्वातंत्र्याचा लढा हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली लढला गेला, पण काँग्रेसच्या नेत्यांनी मुस्लीम नेत्यांसमोर नमती भूमिका घेतली. त्यामुळे या देशाची फाळणी झाली. तलाक दिलेल्या मुस्लीम महिलेला पोटगी मिळवण्याचा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी संसदेत फिरवला. फक्त तीन वेळा तलाक म्हटले की मुस्लीम महिलेचे आयुष्य उद्ध्वस्त होऊन जाते याचा विचार काँग्रेसच्या नेत्यांनी केला नाही.संसदेवरील अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार अफजल गुरूला आणि मुंबईवर हल्ला करणारा अजमल कसाबला फाशीची शिक्षा झालेली असताना केवळ मुस्लिमांच्या भावना फुलवून त्याचा फायदा मिळवण्यासाठी त्यांना पोसून ठेवण्यात आले. पुढे जेव्हा नरेंद्र मोदी यांना प्रतिसाद वाढत आहे हे लक्षात आल्यावर काँग्रेसने अफजल गुरू आणि कसाबला रातोरात फासावर चढवले. काँग्रेस नेत्यांच्या मुस्लीम भयगंडातूनच कट्टर हिंदुत्ववादाचा जन्म झालेला आहे. काँग्रेस नेत्यांनी मुस्लिमांबद्दल वाटणार्‍या या भीतीलाच पुरोगामीत्वाचा गोंडस मुलामा दिलेला आहे. काँग्रेस नेत्यांनी मुस्लिमांना भुरळ पाडणारी अनेक विधाने केली, पण प्रत्यक्षात त्यांच्या विकासासाठी जे करायला हवे होते ते केले नाही. नाहीतर आज आपल्या देशातील मुस्लीम समाज इतक्या प्रमाणात मागास दिसला नसता. त्यांची मुले चांगले शिक्षण घेऊन देशाच्या मुख्य प्रवाहात आली असती. प्रत्येक मुस्लीम हा दहशतवादी नाही, पण जे दहशतवादी पकडले जातात ते बहुतांश मुस्लीम असतात. हा काँग्रेसच्या लांगुलचालन धोरणाचा पराभव आहे. काँग्रेसने आजवर मुस्लिमांना गोंजारून त्यांच्या एकगठ्ठा मतांचा निवडणुकीत फायदा करून घेतला, पण त्या समाजात सुधारणेची प्रक्रिया राबवून त्यांचा फायदा होईल असे पाहिले नाही.

# पृथ्वीवरील नरकात गुदमरून मरणारी माणसे!

**मुंबईतील मालाडमध्ये बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या चेंबरमध्ये श्वास गुदमरून एका सफाई कामगाराचा मृत्यू झाल्याची बातमी एव्हाना जुनी झालेली असते. या सफाई कामगाराला वाचवण्यासाठी गेलेल्या तरुणाचाही टाकीत श्वास गुदमरून मृत्यू झाला असून तिसऱ्या व्यक्तीची स्थिती रुग्णालयात चिंताजनक असते. सफाई कामगारांच्या मृत्यूचा विषय पावसाळ्यापूर्वी दरवर्षी चर्चिला जातो. मुंबई, ठाण्यासारख्या महापालिका, राज्यातील मोठ्या शहरांचे सांडपाणी, मैला वाहून नेणारी गटारे, नाले, मॅनहोल, मोऱ्यांचा विषय पावसाळ्याआधी महत्त्वाचा वाटत असतो. मुंबई, ठाणे तुंबण्याची भीती २६ जुलै २००५ पासून कायम असते. निवडणुका येतात, जातात. सरकारे बनतात, कोसळतात. धार्मिक, जातीय राजकारण सुरूच असते. या सर्व गदारोळात नाल्याच्या तळागाळात रुतलेल्या 'क': पदार्थ असलेल्या सफाई कामगाराकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ नसतो. देशात स्वच्छ भारत अभियान राबवले जात असताना सफाई कामगारांविषयी समाजाच्या मनातली उदासीनतेची जातीय घाण स्वच्छ व्हायला हवी.**



सफाई कामगार ही अशिक्षित, मैला काढून काढून भेगाळलेल्या हातावर पोट असलेली निरुपद्रवी जमात असते. त्यांना घटनात्मक हक्क अधिकारांबाबत काहीच माहिती नसते. संविधान, कायदे, आर्थिक उत्पन्नाचा निदेर्शांक, शेअर बाजार, दर माणसाचे सरासरी उत्पन्न, महागाई, मंदिर-मशीद वाद, जातीय, आर्थिक नीती, जातीय, धार्मिक अस्मिता असल्या कुठल्याच राजकारणात त्यांना वर्षानुवर्षे फासलेल्या दुर्गंधीवर अत्तराचं काम करत नाही.

या काळोख्या खोल गर्तेत शेकडो वर्षांपासून सफाई कामगार अडकलेले असतात. 'सफाई कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर' सफाई कामगारांच्या मृत्यूनंतर हा बातमीचा घासून गुळगुळीत झालेला मथळाही पंधरा-वीस वर्षे घासून ट्यूबवर चालणाऱ्या मैल्याच्या ट्रकसारखा लक्तरलेला असतो. लक्तरं, हाडांचा सापळा, असल्या नाटकीय वाक्यांमुळे पेटलेल्या मशालींचा उजेड सफाई कामगारांच्या वाल्मिकी किंवा भीम नगरातून जाताना शेकडो वर्षांपासून विझलेला असतो.

सफाई कामगारांचं मरण इतकं स्वस्त, सहज असतं की वर्तमानपत्रातल्या कोपऱ्यात सोन्याचा आजचा दर किंवा आजचे तापमान अशा चौकटीत आजचे सफाई कामगारांचे मृत्यू नोंद करणारी आकडेवारी छापण्यास पत्रकारितेला हरकत नसते. मालाडमध्ये दोन दिवसांपूर्वी दोन सफाई कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा सफाई कामगारांच्या नरकातल्या जगण्याची चर्चा होते. 'आमच्या परिसरात डंपिंग ग्राऊंड नकोच' म्हणून शेकडोने मोर्चे काढणारा समाज सफाई कामगारांच्या मरणावर कायमच निबर झालेला असतो. सफाई, स्वच्छता अभियानांसाठी केंद्रातल्या सरकारांकडून मोठा निधी पालिकांना मिळालेला असतो.

सफाई कामगारांना यापुढे हातमोजे, हेल्मेट, मास्क, प्राणवायू यंत्रणा पुरवणार, सफाई कामगारांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या कंत्राटदारावर गुन्हा दाखल करणार, त्याला शिक्षा होणार, असल्या फुटकळ आश्वासनांवर सफाई कामगार संघटनांना निकालात काढले जाते. मालाडमधल्या सफाई कामगारांच्या मृत्यूनंतर एकाच घरातल्या कर्त्या माणसाचा मृत्यू आणि दुसरा भाऊ व्हेंटिलेटरवर असतो. संबंधित सफाई कामगारांचे आईवडील वृद्धत्वामुळे आजारी असतात, तर सफाई कामगाराची लहान मुले पोरकी झालेली असताना डोक्यावरचं छप्परच गेल्यानं सफाई कामगाराच्या पत्नीला दिलासा द्यायला कोणीच नसते.

मिथेनच्या मरणाच्या अंधाऱ्या नरकात सफाई कामगाराला उतरवणारा संबंधित बांधकाम व्यावसायिक नुकसानभरपाई म्हणून एक लाख रुपये द्यायला तयार असतो, सोबतच अशा गोष्टी घडत असतात...असंही तो बोलून जातो. या कंत्राटदार किंवा बांधकाम व्यावसायिकाचं असं सफाई कामगारांचे मृत्यू गृहीत धरणं हे भवतालचा सफाई कामगारांबद्दलचा दृष्टिकोन समोर आणतं. करून करून काय करेल? आणखी ५० हजार देऊन प्रकरण मिटवण्याकडे सफाई कामगारांच्या गलिच्छ मरणाला जबाबदार असलेल्यांचा कल नवा नसतो. आजपर्यंत सफाई कामगारांच्या कित्येक मृत्यूला जबाबदार असलेल्यांपैकी किती जणांवर गुन्हे दाखल झाले आणि किती जणांना शिक्षा झाली?

या प्रश्नाशी भवतालच्या समाज समुदायाला काहीही देणेघेणे नसते. त्यांच्या लेखी सफाई कामगार ही जिवंत माणसे नसतातच, त्यांना भवतालचा समुदाय यंत्रमानवच समजत असतो, अरे हो... रोबोटकडून मेनहोलची साफसफाई करण्यासाठी परदेशातून असे रोबोट महापालिकांकडून मागवलेले असतात, परंतु या रोबोटसाठी येणार्‍या खर्चाच्या तुलनेत कंत्राटी सफाई कामगारांचा पगार अतिकिरकोळ असल्यानं असे रोबोट्स आधीच डबघाईला आलेल्या महापालिकांना परवडत नाहीत. त्यामुळे सफाई कामगारांवरच हे 'मोलाचे काम' सोपवले जाते. कामगारांना आवश्यक सुरक्षा साधनांसाठी पालिका किती खर्च करते?

खरेच ही सुरक्षा साधने कामगारांपर्यंत पोहचतात का? या प्रश्नांची वर्तमानपत्रातल्या कित्येक बातम्यानंतरही दखल घेतली जात नाही. सफाई कामगारांचा गटार, मेनहोल साफ करताना मृत्यू झाल्यावर कामगाराचे नातेवाईक नुकसानभरपाई मिळाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा घेतात, स्थानिक नगरसेवक, समाजसेवकांकडून गल्लीबोळातल्या इतर कामगारांना घेऊन कंत्राटदार पालिकेच्या विरोधात मोर्चा काढला जातो. त्यानंतर भावनिक भाषणे होतात, प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आश्वासन दिले जाते, संबंधित जबाबदारांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना जामीन मिळतो आणि पुन्हा 'पहिले पाढे पंच्चावन्न' होतात.

दोन दिवसांपूर्वी मालाड पूर्व भागात एका ठिकाणी बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या आवारातील अठरा फूट खोल चेंबरमध्ये उतरलेल्या ६८ वर्षाच्या रघू सोलंकी या सफाई कामगाराला चेंबरमध्येच चक्कर आल्यानं श्वास गुदमरून मृत्यू झाला, एका कामगाराची वेदना दुसर्‍या कामगाराला समजते या न्यायाने जवळच्या इमारत बांधकामावर असलेले आकिफ, हुसेन शेख आणि जावेद हे इमारत कामगार चेंबरमध्ये रघूला वाचवायला उतरले.

यात जावेदचाही विषारी गॅसमुळे मृत्यू झाला तर इतर दोघांची स्थिती चिंताजनक झाली. एव्हाना रघूवर अंत्यसंस्कार झालेही असतील, 'सफाई कामगारांचा चेंबरमध्ये मृत्यू' हा बातमीचा मथळाही आता वाचून घासून गुळगुळीत होऊन संपत गेला आहे. रघुला वाचावायला मरणाच्या नरकात उतलेल्या तरुणांचं वय अवघं २० ते २२ आणि ३९ आहे, रघुला वाचवायला गेलेल्यांचे नातेवाईक पोलीस ठाणे आणि रुग्णालयाच्या फेऱ्या मारत आहेत, तर चेंबर साफ करण्याची जबाबदारी असलेला सुपरवायझर मनोहरन नाडर (५१) जामिनावर सुटला आहे.

मालाडच्या चेंबरमध्ये दुर्घटना झाल्यावर अग्निशमन दल, पोलीस दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी ऑक्सिजन मास्क घालून चेंबरमध्ये शिरकाव केला, मात्र त्यांची मास्क असतानाही घुसमट झाल्याने ते बाहेर आले, या अशा मरणाच्या नरकात कुठलीही सुरक्षा साधने न घेता उतरणाऱ्या कामगारांना या नरकात उतरण्याला भाग पाडणारा भवताल हा या नरकापेक्षा जास्त भयानक आहे. मृत आणि बेशुद्ध झालेल्या चेंबरमधल्या कामगारांना बाहेर काढल्यावर त्यांच्यासाठी ॲम्ब्युलन्स नव्हती रिक्षातून त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, हॉस्पिटलमध्ये रघु आणि जावेद या दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या दुर्घटनेला केवळ नाडर हा सुपरवायझर जबाबदार नाही, मानवी विष्ठेने भरलेला नरक साफ करण्याचं काम देताना किमान माणुसकीचाही अभाव असलेल्या रोगट भवतालने या कामगारांचा मृत्यू झालेला आहे. सफाई कामगारांचे प्रश्न मांडणाऱ्या 'ईपीडब्लू'च्या संशोधन अहलावानुसार सफाई काम करताना कामगारांसोबत घडलेल्या दुर्घटना या बहुतांश नोंदवल्याच जात नाहीत, म्हणजेच प्रकरणे परस्पर थोडेथोडके पैसे देऊन मिटवली जातात.

खासगी बिल्डर्सकडून अशी धोकादायक गलिच्छ कामे करण्यासाठी कंत्राटदार नेमलेले असतात, आपला फायदा वाढावा यासाठी कंत्राटदाराकडून सुरक्षेसाठीची रक्कम मारून कामगारांना जमिनीखालच्या नरकात मरण्यासाठी सोडले जाते. सुरक्षेसाठीचे कामगार कायदे कागदावर राहतात. ते प्रत्यक्षात उतरत नाहीत.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी गटार, पाईपलाईन, नालेसफाईच्या कामांना सुरुवात होते. ही कामे मशीनच्या मदतीने करण्यासाठी न्यायालयाचे आदेश आहे. मात्र निर्जीव मशीनच्या तुलनेत जिवंत कामगार सफाईसाठी स्वस्तात उपलब्ध असल्याने सफाई कामगारांचे मरणसत्र कायम सुरूच असते. सफाई कामगार हे नरक साफ करण्याच्या कामामुळे कायमच निरक्षर, विविध आजारांनी गांजलेले, व्यसनी झाल्याचे स्पष्ट आहे. वर्षानुवर्षे मैल्याचे चेंबर, मेनहोल साफ करून त्यांचे आयुर्मान हे पन्नाशी गाठली तरी 'खूप जगला' या चौकटीत येते. मुळातच असे कामगार असंघटित, नोंदणीकृत आणि दरिद्ररेषेखालील असल्याने त्यांच्या जगण्या मरण्याने भवतालला कुठलाही फरक पडत नाही.

काही महिन्यांपूर्वी विरारच्या 'ग्लोबल सिटी' येथील एका खासगी सांडपाणी प्रकल्पाच्या टाकीची स्वच्छता करताना टाकीत उतरलेल्या चार सफाई कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. अग्निशमन दलाने या चारही सफाई कामगारांचे मृतदेह बाहेर काढले, सफाई कामगारांच्या मरणात जातीय, प्रांतीक भेद नसतो, सगळे एकाच पद्धतीने घुसमटून, गुदमरून मरतात, विरारमधले चारही सफाई कामगार 'मराठी' असतानाही त्यांच्यासाठी महाराष्ट्रातले तमाम मराठीजन 'रोजचे मढे त्याला कोण रडे' च्या भूमिकेत असतात.

केंद्रीय सामाजिक न्याय, सबलीकरण मंत्रालयाने (एमएसजेई) दिलेल्या माहितीनुसार वर्ष २०१६ ते २०१९ या काळात सेप्टीक टँक, चेंबर्स, मेनहोल साफ करताना भारतात २८२ सफाई कामगारांचा मृत्यू झाला हा केवळ नोंदणी झालेला आकडा आहे. म्हणजेच दिवसाला एक किंवा दोन ते तीन अशी सरासरी नरकात उतरणाऱ्या सफाई कामगारांच्या मृत्यूची म्हणावी लागेल. देशात स्वच्छ भारत अभियान चालवले जात असताना सफाई कामगारांविषयी भवतालच्या मनातली उदासीनतेची जातीय घाण स्वच्छ व्हायला हवी.

# ब्रिटिशकालीन जलवाहिनी दुरूस्तीचे काम सुरू

## आग्रारोड परिसरातील नागरिकांना मिळणार पाणी गळतीपासून मुक्तता

**भिवंडी**: पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी भिवंडी महापालिकेने ब्रिटिशकालीन ६५ वर्षे जुनी जलवाहिनी बदलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.त्यामुळे शहरातील जुना आग्रा रोड परिसरातील ५० हजारांहून अधिक नागरिकांना पाणी गळतीपासून मुक्ती मिळणार असून उत्तमरित्या पाणीपुरवठा केला जाणार आहे.दुरुस्तीसाठी महापालिका करणार १.२५ कोटी रूपये खर्च करणार आहे. जलवाहिनी बदलण्याचे काम ४० टक्के पूर्ण झाले असून येत्या जूनपर्यंत पावसाळ्यापूर्वीच जलवाहिनी बदलली जाणार



> "जलवाहिनी बदलताना जनतेला पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, यासाठी पाणीपुरवठा विभागातर्फे उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे .धामणकर नाका परिसरात नागरिकांना पाणी मिळावे यासाठी जलवाहिनीला व्हाल्व लावण्यात आले आहे. जलवाहिनी बदलली जात असलेल्या ठिकाणी जनतेला उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये म्हणून दररोज ४ टँकरद्वारे २० फेऱ्या करून पाणीपुरवठा केला जात आहे.
>
> **संदिप पटणावर**
> **महापालिका प्रभारी कार्यकारी अभियंता**

असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.याद्वारे जुना ठाणे रोडवरील भिवंडीच्या धामणकर नाक्यादरम्यान येणाऱ्या निजामपूर, बाजा मोहल्ला, पारनाका, कासार अली, ठाणगे अली, ब्राम्हण आळी, बंदर मोहल्ला, गौरी पाडा, धामणकर नाका, माधवनगर, सोमनगर आदी भागात पाणीपुरवठा होणार आहे.या ६५ वर्षे जुन्या ब्रिटीशांच्या काळातील जलवाहिनीच्या गळतीमुळे सुमारे २५ टक्के पाणी वाया जात होते.त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठया प्रमाणात पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. मागील काही महिन्यांपूर्वी एमएमआरडीए कडून उपलब्ध झालेल्या निधीतून जुना ठाणे रोडवर आरसीसी रस्त्याच्या कामा दरम्यान पाणीपुरवठा करणारा ५०० एमएम सिमेंटचा पाईप तुटला होता.त्यानंतर महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे आदेश दिले.त्यानुषंगाने आयुक्तांच्या आदेशानंतर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता संदिप पटणावर यांनी ब्रिटीश कालीन जलवाहिनींच्या जागी महापालिकेकडील उपलब्ध ४५० मिमी सिमेंट पाइप टाकण्याचे कंत्राट हिंदुस्थान एंटरप्रायझेस या कंपनीला दिले असून जलवाहिनी बदलण्याचे काम १५ मार्चपासून सुरू झाल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

> तसेच नवीन जलवाहिनी ही जुन्या जलवाहिनी ऐवजी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस टाकण्यात येत आहे .विशेष म्हणजे महापालिकेकडे पाईप उपलब्ध असूनही महापालिका प्रशासन जलवाहिनी बदलीसाठी १ कोटी २५ लाख रुपये खर्च करत आहे .दरम्यान सद्यस्थितीत ब्रिटिश कालीन जलवाहिनी बदलण्याचे काम ४० टक्के पूर्ण झाल्याची माहिती पटणावर यांनी दिली आहे .यासह जून पर्यंत कामाची पूर्तता करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून यामुळे पाण्याची अपव्ययता टाळली जाऊन संबंधित परिसरातील नागरिकांना वेळेनुसार आणि आवश्यकतेनुसार पाणी मिळणार आहे .

# 'आरटीई'च्या नव्या नियमांना आव्हान

**मुंबई** : शालेय शिक्षण विभागाने 'आरटीई'च्या प्रवेशप्रक्रियेत केलेल्या बदलांमुळे त्यासाठी असलेल्या मूळ कायद्यालाच बगल दिला जात आहे. खासगी शाळांमध्ये आणि विशेषतः मुलांना शिक्षणाचा हक्क नाकारला जाणार आहे, त्यामुळे शिक्षण विभागाच्या ९ फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या बदलाच्या निर्णयाला अखिल भारतीय समाजवादी शिक्षण सभेने उच्च न्यायालयात आव्हान दिले असल्याची माहिती सभेचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. शरद जावडेकर यांनी दिली. ही जनहित याचिका गुरुवारी (ता. २५) मुंबई उच्च न्यायालयाने दखल करून घेतली असून यामध्ये अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेबरोबर शिवाजी तलवारे-पुणे, राहुल बनसोड व संदीप पाटील-भोसरी हे तीन पालकसुद्धा याचिकेत अर्जदार असल्याचे प्रा. जावडेकर यांनी सांगितले. शिक्षण विभागाने केलेल्या बदलांमुळे राज्यातील खासगी व्यवस्थानांच्या शाळांना पद्धतशीरपणे आरटीई प्रवेशापासून वेगळे करण्यात आले आहे. यामुळे मूळ शिक्षण हक्क अधिकार कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींनाच हरताळ फासला गेला आहे. शिवाय यामुळे मोठ्या प्रमाणात शिक्षण हक्कही नाकारला जाणार असल्याने शिक्षण विभागाने केलेली ही चूक सुधारून घ्यावी, अशी आमची मागणी असल्याचेही त्यांनी सांगितले. नव्या बदलांमुळे संविधानातील कायद्याचा भंग होत आहे, अशी आमची भूमिका असल्याने यासाठी अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा-पुणे, मूव्हमेंट फॉर पीपल्स जस्टिस-पुणे व नागपूर येथील जनहित याचिका या मुंबई उच्च न्यायालयात एकत्र करण्यात आल्या आहेत. यावरील सुनावणी ८ मे रोजी होणार आहे. या याचिकेत आमची पहिली मागणी ही या निर्णयाला स्थगिती देण्याची आहे. दुसरी मागणी ही ९ फेब्रुवारी २०२४ची गॅझेट नोटीस पूर्णपणे मागे घ्यावी व विनाअनुदानित शाळांना पूर्वीप्रमाणे २५ टक्के प्रवेशाची तरतूद लागू करावी, अशी असल्याचे त्यांनी सांगितले.

# Admiral Dinesh Tripathi takes over as Chief of Naval Staff



**NEW DELHI :** Admiral Dinesh K Tripathi assumes office as India's 26th chief of naval staff, succeeding Admiral R Hari Kumar. An alumnus of Sainik School, Rewa, and the National Defence Academy, he was commissioned into the navy in 1985. Prior to his appointment, he served as the vice chief of naval staff.

Tripathi emphasizes the navy's readiness to deter adversaries and prioritize indigenization and modernization efforts. He takes charge amid challenges such as China's power projection, maintaining the rules-based international order, and piracy resurgence. Tripathi is recognized for his expertise in communication and electronic warfare and has held key operational and staff roles throughout his career spanning almost four decades.

# 'BJP will tear apart and throw Constitution' if voted back to power', claims Rahul Gandhi



**NEW DELHI :** Congress MP Rahul Gandhi on Tuesday claimed that the Bharatiya Janata Party (BJP) will "tear apart" and "throw-away" the Constitution if it returns to power at the Centre.

Addressing a poll rally in Madhya Pradesh's Bhind, Gandhi, while holding a copy of the Constitution, said the ongoing Lok Sabha poll are not any normal election, but a fight between two ideologies.

"The poor, STs, OBCs got several rights because of the Constitution which also gave the people MGNREGA, land rights, reservation, and other things," Gandhi said, according to PTI. "If the BJP comes to power, it will throw away and tear apart this Constitution."

Gandhi further claimed: "The prime minister, Amit Shah (Union Home Minister) and their MPs have made up their mind that if they get elected, they will tear apart and throw this (Constitution) book. The BJP wants this book to be thrown away and 20-25 billionaires should run the country."

In his speech, the Wayanad MP also targeted the BJP over the issue of reservation. If the ruling dispensation is not against reservation, then why is it privatising PSUs, the Railways and other sectors, he asked.

"If you are not against reservation then why are we privatising the public sector? Why did you bring the Agniveer scheme? Why are you promoting the practice of contracting? All these activities are against reservation," he said.

Gandhi also said that if the Congress comes to power, it will make crores of women "lakhpati" through its Mahalaksmi Yojana.

Under the scheme, the government will transfer ₹.1 lakh ( ₹.8,500 per month) into the accounts of the women to make them "lakhpati", he said.


Rahul Gandhi holds empty pot at Karnataka rally, takes 'Chombu' swipe at Narendra Modi's BJP

"If Prime Minister Narendra Modi can turn 22-25 industrialists into billionaires, then the Congress will turn crores of women into lakhpatis," Gandhi said, according to PTI.

# Delhi court dismisses Manish Sisodia's second bail plea in liquor policy case

**NEW DELHI :** Delhi Rouse Avenue Court dismissed the second bail application moved by Delhi's former deputy chief minister Manish Sisodia in the cases registered by CBI and ED in connection with the probe into the now scrapped Delhi liquor excise policy 2021-22.

On April 20, special judge for CBI and ED Kaveri Baweja had reserved the order for Tuesday after hearing arguments from the central agencies as well as Sisodia's counsel. Sisodia had also moved interim bail pleas in both cases to campaign for Lok Sabha elections.



Both the CBI and ED alleged that the irregularities were committed while modifying the Delhi Excise Policy, undue favours were extended to licence holders, the licence fee was waived or reduced and licences were extended without the competent authority's approval.

The beneficiaries allegedly diverted "illegal" gains to the accused officials and made false entries in their books of account to evade detection, the probe agencies alleged further.

Sisodia was arrested by the Central Bureau of Investigation (CBI) on February 26, 2023, for his alleged role in the "scam".

The Enforcement Directorate (ED) arrested the former deputy chief minister in a money-laundering case stemming from the CBI FIR on March 9, 2023. Sisodia resigned from the Delhi cabinet on February 28, 2023.

Sisodia's boss Arvind Kejriwal was arrested on March 21 after skipping nine summons issued by the ED in the same case. He is currently in judicial custody till May 7.

On Tuesday, Kejriwal told the Supreme Court that his non-appearance before the ED in pursuance of the repeated summons and his alleged non-cooperation cannot be a ground necessitating his arrest.

Appearing for the Aam Aadmi Party convener, senior advocate Abhishek Manu Singhvi told a bench of Justice Sanjiv Khanna and Justice Dipankar Datta that the central agency has no material available to take away his liberty.

## सरळगांवची वाहतूक कोंडी सुटेना

■ **सरळगांव**: आठवडी बाजारासाठी प्रसिध्द असलेल्या सरळगाव येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटता सुटेना. वारंवार वाहतूक कोंडीमुळे जनता त्रस्त झाली आहे. मुरबाड तालुक्यातील कल्याण -माळशेज घाट या राष्ट्रीय महामार्गावरील आठवडी बाजारासाठी सरळगांव प्रसिद्ध आहे. तालुक्यातील मोठी बाजारपेठ म्हणून चर्चेत आहे. जेवढी दुकाने पक्या गाळयात आहेत. त्याच्या दुप्पट दुकाने या राष्ट्रीय महामार्गाला चिटकून थाटलेली आहेत. मोठी बाजारपेठ असल्याने जनतेबरोबरच प्रवाशी वाहातूक करणाऱ्या रिक्षा,जीप व खाजगी वाहने ही मिळेल त्या जागेवर पार्क केल्याचे दिसून येतात. पोलीस चौकी असूनही वाहतूक कोंडी होतच आहे. बाजार रस्त्यावरच भरत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता असते. सरळगांव ग्रामपंचायतीची काय भूमिका आहे.ते वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून कोणती उपाय योजना करत आहेत.पोलीस खातेही काय करत आहे हे जनतेला समजत नाही.

# माणकोली पूल गुरूवारपर्यंत वाहतूकीस राहणार बंद

### भारमान तपासणीसाठी वाहतूकीला 'थांबा'

■ **डोंबिवली** : डोंबिवलीतील मोठागाव - माणकोली उड्डाण पुलाचे काम पूर्ण होवून तो हलक्या वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे .माणकोली दिशेकडील भिवंडी बायपास येथे कनेक्टीव्हिटी रोड तयार करण्याचे काम शिल्लक असल्याने या पुलाचे लोकार्पण करण्यात आले नाही .आता पुलाच्या वजन भार तपासणीच्या कामासाठी सोमवार २९ एप्रिल ते २ मे गुरुवार या कालावधीत पुलावरील वाहतुक बंद ठेवण्यात येणार असल्याचे फलक एमएमआरडीएने डोंबिवलीतील रस्त्यांवर लावले आहेत.



डोंबिवलीतून अत्यंत कमी वेळेत थेट ठाणे ,मुंबई गाठण्यासाठी मोठागाव - माणकोली दरम्यान असणाऱ्या खाडीवर उड्डाण पुलाचे काम गेली अनेक वर्षे सुरु होते .२०२३ च्या अखेरीस पुलाचे काम पूर्ण झाले आहे. या पुलाच्या भिवंडी बाजूकडील मुंबई-नाशिक-आग्रा राष्ट्रीय महामार्गा पर्यंतच्या सहापदरी रस्त्याचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे. डोंबिवली बाजूकडील रस्त्याचे काम देखील पूर्ण झाले .मात्र भिवंडी बायपास जोडणाऱ्या रस्त्याचे काम एमएमआरडीएकडून सुरू आहे. त्यामुळे या पुलाचे लोकार्पण करण्यात आले नाही. खाडीवरील पुलाचे काम पूर्ण झाल्याने जनतेत असंतोष वाढू नये म्हणून सध्या छोट्या प्रवासी वाहनांच्या वाहतुकीसाठी हा पूल खुला करण्यात आला आहे .

त्यामुळे छोटया वाहनाने डोंबिवलीहून अवघ्या अर्धा तासात ठाणे तर एक तासात मुंबई गाठता येत आहे.सध्या रस्ता वाहतूक कोंडी मुक्त असल्याने प्रवासी माणकोली पुल मार्गे ठाणे ,मुंबईला जाण्यासाठी अधिक पसंती देत असल्याचे चित्र आहे .या पुलावर काही धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी एमएमआरडीएवर येण्याची शक्यता असल्याने त्यातून बचाव करण्यासाठी प्राधिकरणाने पूल अधिकृतपणे सुरू झालेला नाही. त्यामुळे पुलावरून वाहतूक करू नये,असेही फलक आधीच या रस्त्यावर लावले आहेत.जड, अवजड वाहनांना या पुलावरून वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे .त्यामुळे फक्त छोटी वाहने जातील,असे अडथळे रस्त्यात करण्यात आले आहेत .दोन मार्गिकांपैकी एक मार्गीकाच सुरु ठेवण्यात आली आहे .अवजड वाहनांची वाहतूक सुरु झाल्यास रेतीबंदर रेल्वे फाटक व डोंबिवलीतील अंतर्गत रस्त्यांवर देखील वाहतुकीची अधिक कोंडी होण्याची भीती वर्तविण्यात येत आहे.

■ पुलावरील वाहतुकीमुळे भार वाढू लागल्याने एमएमआरडीएने या पुलावरील वाहन भार तपासणीचे काम चार दिवसात करण्याचे नियोजन केले आहे .त्याचसाठी सोमवार ते गुरुवारपर्यंत माणकोली उड्डाण पूल वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.

■ याच काळात मोठागाव देवीचा पाडा येथील गावदेवीची यात्रा असल्याने मोठागाव येथील चौकापर्यंत मोठी गर्दी होत असते .त्यामुळे या भागातील वाहतुक नियंत्रित करण्यासाठी रस्ते बंद करण्यात येत असतात.

■ या सगळ्या बाबींचा प्राधिकरणाने विचार करून शनिवारीच या रस्त्यावर पूल बंद राहणार असल्याचे फलक लावले आहेत .त्यामुळे पुढील चार दिवस पुन्हा शिळफाटा किंवा पत्रीपूल मार्गे वळसा घालून ठाणे,मुंबईला जावे लागणार आहे.

## कोपरीमध्ये कार दुभाजकाला धडकली

■ **ठाणे** : ठाण्याच्या कोपरी परिसरातील बारा बंगला जवळ, कोपरी, पूर्व द्रुतगती महामार्ग, ठाणे (पू.) या ठिकाणी सर्व्हिस रोडवर बाईकस्वाराला वाचवण्याच्या नादात कारचे नियंत्रण सुटले आणि कार दुभाजकाला धडकली आणि उलटली. यात कुणीही जखमी झालेले नाही. तर कारचे नुकसान झाले. या कारमध्ये दोनजण प्रवास करत होते. कोपरी, पूर्व द्रुतगती महामार्गाच्या सर्व्हिसरोडवर कर चालक गिरधर पै रा. रुस्तमजी अर्बेनिया, ठाणे हे मुंबईवरून माजिवडा येथे निघाले होते. एका अज्ञात बाईकस्वरामुळे वाहनावरील ताबा सुटून कार रस्त्यावरील डिव्हायडरला धडकल्याने पलटी होऊन अपघात झाला.

## महिलेची क्रेडिट कार्डद्वारे फसवणूक

■ **मीरारोड** : नवघर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिलेची क्रेडिट कार्ड द्वारे ऑनलाईन १,८७,२०६ रुपयांची फसवणूक करण्यात आली होती.फसवणूक करण्यात आलेली रक्कम सायबर पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिली आहे. वृषाली यांना क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगून अनोळखी मोबाईल धारकाने फोन केला. क्रेडिट कार्डाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठी तक्रारदार यांना कार्डाची माहिती देण्यास सांगून त्यांची फसवणूक केली.

# प्रचंड उष्म्याने सलग दुसऱ्या दिवशीही ठाणे 'तापलेलेच'!



■ **ठाणे** : ठाणे शहरात सलग दुसऱ्या दिवशी तापमानाचा पारा ४१ अंशाच्या पार गेला. सोमवारी २९ एप्रिलला दुपारी दोन वाजून १५ मिनिटांनी ठाणे शहरातील तापमानाचा पारा ४१.३ अंश सेल्सिअसवर पोहोचला होता. वाढलेल्या तापमानामुळे ठाणेकरांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली होती. तसेच पुढील काही दिवस उष्णतेचा पारा वाढणार असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

हवामान खात्याने रविवार आणि सोमवार या दोन दिवसांत तापमानात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला होता.त्यानुसार सोमवारी सकाळपासूनच वातावरणात उष्णता वाढण्यास सुरुवात झाली होती.त्यानंतर उष्णता वाढतच गेली. त्यात ठाणे शहरातील तापमान दुपारी दोन वाजून १५ मिनिटांनी ४१.३अंश सेल्सियस इतके नोंदवले गेले. तर दिवसातील सर्वात कमी तापमान सकाळी साडे सहा वाजता ३०.१ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. त्यानंतर दिवसभर तापमान तीस अंश सेल्सिअसच्या पुढेच होते.या वाढलेल्या तापमानामुळे ठाणेकरांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली होती. रस्त्यावरून पायी चालणाऱ्या नागरिकांनी डोक्यात टोपी, तर, काहींनी छत्री घेवून बाहेर पडण्याच्या निर्णय घेतला.

तर, अनेकांनी थंड पेयच्या गाड्यांवर आपला मोर्चा वळवला असल्याचे दिसून आले.वातवरणातील वाढत्या उन्हाच्या काहीलीमुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.





## ठाणे पालिका क्षेत्रातील १७ जणांना उष्माघाताचा त्रास

■ **ठाणे** : सध्या वाढत असलेल्या तापमानाने अनेकांना उष्णतेचा त्रास जाणवू लागला आहे. ठाणे, मीरा भाईंदर आणि भिवंडी येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी १९ जणांनी धाव घेतली. यामध्ये सर्वाधिक १७ रुग्ण हे ठाणे पालिका क्षेत्रातील आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांना त्रास जाणवू लागला आहे.त्यातील काही नागरिकांनी उष्णतेचा त्रास जाणवू लागताच सरकारी रुग्णालयात धाव घेतली. त्यानुसार ठाणे पालिकेच्या कौसा प्राथमिक आरोग्य केंद्रासह भिवंडीच्या आझमीन नगर येथील आरोग्य केंद्रात तर,मीरा भाईंदर येथील भारतरत्न इंदिरा गांधी हॉस्पिटल येथे बाह्यरुग्ण विभागात १९ व्यक्ती उपचार घेवून घरी गेले.यामध्ये ठाणे पालिकेच्या कौसा प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्वाधिक १७ रुग्णांनी उचार घेतला असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. १ मार्चपासून वातावरणातील बदलामुळे



सर्वत्र उष्णतेत वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली आहे.

ठाणे शहरासह जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचा पारा ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहचला आहे.यामुळे शहरात सकाळी १० वाजेपासूनच ऊनाच्या झळा बसण्यास सुरूवात होते. १२ वाजता कडक ऊन पडते. दुपारी ४ वाजेनंतर ऊनाच्या झळा कमी होतात. दरवर्षी शहरातील तापमान वाढताच उष्णतेपासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करु नये,याविषयी जिल्हा आरोग्य विभागसह जिल्ह्यातील विविध पालिका प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. यंदा एप्रिल महिन्यात शहरातील तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहचला असून मे महिन्यात त्यात आणखी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम मिळवून दिली परत

■ **मीरारोड** : नवघर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिलेची क्रेडिट कार्ड द्वारे ऑनलाईन १,८७,२०६ रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. फसवणूक करण्यात आलेली रक्कम सायबर पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिली आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नवघर पोलीस ठाणे हद्दीतील तक्रारदार वृषाली यांना क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगून अनोळखी मोबाईल धारकाने फोन केला. क्रेडिट कार्डाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठी तक्रारदार यांना कार्डाची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी कार्डाची माहिती दिली असता त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातून २,०६,१५३ रुपये कपात झाल्याचा मॅसेज आल्याने त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती

# जुन्या वास्तूंचा कायापालट सुरू करा : आयुक्त

### ▌प्रस्ताव जलद गतीने सादर करा ▌आचारसंहिता संपल्यावर मंजुरी घ्यावी

■ **ठाणे** : नागरिकांच्या सोयीसाठी, तसेच सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेची रुग्णालये, शाळा, मार्केट आणि प्रशासकीय कार्यालये इ. जुन्या वास्तूंचा कायापालट करण्याची मोहीम सुरू करा, असे आदेश पालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. कोपरी आणि नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील कामाचा आढावा आयुक्तांनी वागळे प्रभाग समिती कार्यालयात घेतला.

त्यावेळी नौपाडा प्रभाग समिती कार्यालयाची नवीन इमारत आणि कोपरी उपसमिती प्रभाग कार्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती या दोन्ही गोष्टी प्राधान्याने हाती घेण्यात याव्यात. त्याचा प्रस्ताव जलद गतीने सादर करून आचारसंहिता पूर्ण झाल्यावर त्याच्या मंजुरीची, निधीसाठीची प्रक्रिया पूर्ण करावी. नागरिकांना चांगले प्रशासकीय



कार्यालय मिळणे आवश्यक असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. तसेच महापालिकेच्या ज्या वास्तू जुन्या झाल्या आहेत. त्यांचा चेहरामोहरा बदलणे आवश्यक आहे. म्हणूनच नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेची रुग्णालये, शाळा, मार्केट आणि प्रशासकीय कार्यालये इ. जुन्या वास्तूंचा कायापालट करण्याची मोहीम सुरू करण्यात यावी, असे आदेश त्यांनी यावेळी दिले. इमारतीची दुरुस्ती, अंतर्गत आणि बाह्य रंगरंगोटी, प्रवेश आणि निकास मार्गिका, पार्किंग, आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा यांच्याबद्दलचा सविस्तर आराखडा येत्या महिनाभरात बांधकाम विभागाने तयार करावा, असे आदेश आयुक्तांनी दिले. नागरिकांना महापालिकेच्या वास्तूंमध्ये यावेसे वाटले पाहिजे, असेही ते म्हणाले. परिमंडळ उपायुक्त शंकर पाटोळे आणि सहाय्यक आयुक्त सोपान भाईक यांनी कोपरी-नौपाडा प्रभाग समिती क्षेत्राबद्दल सादरीकरण केले. तसेच उपनगर अभियंता विकास ढोले, रामदास शिंदे, विनोद पवार, शुभांगी केसवानी यांनी विविध प्रकल्प, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था यांचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे आदी प्रमुख अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते.

### गांभीर्याने अंमलबाजावणी करा

◆कोपरी आणि नौपाडा क्षेत्रातील सी वन या अतिधोकादायक वर्गवारीतील २६ इमारती अजूनही व्याप्त आहेत. त्यात १७८ कुटुंबे आणि ६७ दुकाने आहेत. त्या तोडण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा. त्याची गांभीर्याने अंमलबजावणी केली जावी, असे आदेशही आयुक्तांनी दिले.

# बारबालांवर पैसे उधळणाऱ्या चोरट्यांचा पर्दाफाश

■ **भिवंडी**: बारबालांवर पैशाची उधळपट्टी करण्यासाठी वाहनांची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला शांतीनगर पोलिसांनी ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.यामध्ये एका आरोपीवर हद्दपारीची कारवाई करण्यात आल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

तर त्याचे दोन साथीदार अल्पवयीन आहेत.शेरजली इमाम फकीर उर्फ पिल्या (२२ रा.गायत्रीनगर,भिवंडी) असे हद्दपारीची कारवाई केलेल्याचे नाव आहे.दरम्यान पोलिसांनी आरोपींकडे कसून चौकशी करून त्यांच्याकडून शांतीनगर,तालुका आणि कोनगाव पोलिस ठाणे हद्दीतील वाहन चोरीचे एकूण १० गुन्हे उघडकीस आणून ४ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या ९ मोटारसायकल व १ ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली आहे. शांतीनगर परिसरात मोठ्या प्रमाणात वाहन चोरीच्या घटना



घडत होत्या.त्यानुषंगाने पोलिस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शांतीनगर पोलिस ठाण्याचे वपोनि विनायक गायकवाड,पोलीस निरीक्षक (प्रशा) विनोद पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल अडूरकर, सपोनि सुरेश चोपडे, पोउपनि सुरेश घुगे, पोह संतोष पवार, पोह रिजवान सैय्यद, पोह संतोष मोरे, पोना श्रीकांत पाटील,किरण जाधव,किरण मोहीते, श्रीकांत धायगुडे,पोशि नरसिंह क्षीरसागर,रोशन जाधव,मनोज मुके,दिपक सानप,रूपेश जाधव,प्रशांत बर्वे या पोलिस पथकाने गुप्त बातमी दारा मार्फत माहिती प्राप्त करत नाकाबंदी दरम्यान सापळा रचून शेरजली यास ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशीअंती त्याच्या अन्य दोन साथीदारांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.विशेष म्हणजे तिघेही बारबालांवर पैशांची उधळपट्टी करण्यासाठी वाहनांची चोरी करत असल्याचे उघड झाले आहे.

# व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे स्थलांतराचा भस्मासुर मजुरांच्या मुळावर

## स्थानिक ठिकाणीच रोजगार मिळाला तर पगाराची मात्र ओढाताण

**खोडाळा** : स्थानिक पातळीवर रोजगार मिळावा स्थलांतर थांबावे या उद्देशाने रोजगार हमी कायदा केंद्र व राज्य शासनाने पारित केला असला तरी स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या कायद्याची अमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्याची बाब वेळोवेळी समोर आली आहे.यंत्रणांची चालढकल आणि नरेगाच्या अकुशल पगाराबाबत केंद्रशासनाने दाखवलेले कमालीचे औदासिन्य यामुळे बाजारपेठेत मंदीचे वातावरण दिसून येत आहे.स्थानिक ठिकाणीच रोजगार मिळाला तरी पगाराची होत असलेली ओढाताण मजुरांच्या स्थलांतरावर आणि पर्यायाने त्यांच्या जीवनमानावर दुरगामी परिणाम करत आहे. १९७७-७८ मध्ये या योजनेचे कायद्यात रूपांतर



### आणखी किती अविनाशचे बळी घेणार..?

◆सन २००८/०९ मध्ये बोटयाचीवाडी येथील रोजगाराचा शोधात स्थलांतरित कुटुंबाला आपल्या अवघ्या ८ महिन्याच्या अविनाशला गरजेपोटी ८०० रुपयांना विकण्याची नामुष्की बरफ कुटुंबावर ओढवली होती.त्याशिवाय भाऊ सोमा गवारी या मजुरालाही आपला जीव गमवावा लागला आहे .तसेच वेठबिगारीच्या घटनाही असंख्य प्रमाणात होतात.त्याशिवाय स्थलांतरामुळे दोन प्रदेश आणि त्यामध्ये राहणाऱ्या लोकांच्या जीवनशैलीत असंतुलन निर्माण होते . लोकसंख्येच्या घनतेवर मोठा परिणाम होतो .शहरी भागांना लोकसंख्येची घनता आणि झोपडपट्ट्यांच्या वाढीचा सामना करावा लागतो, तर ग्रामीण भागात त्यांच्या लोकसंख्येच्या घनतेत मोठी पोकळी निर्माण होते .

केले आहे. या कायद्याच्या धर्तीवर २००५ मध्ये रोजगार हमी कायदा लागू करून या कायद्यातील तरतूदींचे आणि महाराष्ट्राच्या मूळ रोहयोतील तरतूदींचे एकत्रिकरण करून देशातील सर्वच राज्यामध्ये व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) कार्यान्वित करण्यात आली आहे.मुळ योजनेचे उदात्तीकरण झाले असले तरी परिस्थितीत काडीमात्र फरक पडलेला नाही.त्यामुळे होती तीच योजना बरी होती, त्यावेळी घामाचा दाम प्रत्यक्ष हातात येत होता.आत्ता डीबीटी मुळे तर ४/४ महिने पगाराची प्रतिक्षा करावी लागत असल्याची वस्तुनिष्ठ शोकांतिका अनुभवायला मिळत आहे.यंत्रणांची कामचलाऊ वृत्ती आणि पगाराची हेळसांड यामुळे महत्वाकांक्षी योजनेला बासनात गुंडाळून ठेवण्याचे काम केले जात असल्याने आदिवासींची रोजगारा अभावी होणारी फरपट थांबलेली नाही. या योजनेत मागेल त्याला काम मिळत असले तरी १५ दिवसात दाम मिळेलच याची शाश्वती नसल्याने स्थानिक मजुरांचा ओढा स्थलांतराकडे वाढलेला आहे.घरी फक्त म्हातारी माणसं ठेवून बालबच्चे व कुटुंब कबिल्यासह स्थलांतर होणे आणि त्यायोगे अनेक हाल अपेष्टांशी सामना करावा लागणे ही बाब येथील मजुरांना नित्याची आणि सवयीची झालेली आहे.

■ त्यामुळे तालुक्यातील मजुर वीटभट्टी, इमारत बांधकाम, रेती काढणे यासारख्या मिळेल त्या कामाच्या शोधात कुटुंबासह फिरतो. जगण्याचा संघर्ष करत राहतो. परंतु रोजगाराच्या या भटकंतीमुळेच जव्हार, मोखाड, विक्रमगड यासारख्या तालुक्यात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत असतो. वर्षातील ७ ते ८ महिने रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, गरोदर मातांचे व कुपोषणामुळे मृत्यूचे प्रमाण देखील या भागातच जास्त पहावयास मिळते.

■ शासनाने महात्मा गांधी रोजगार हमी योजना २००५ पासून रोजगार हमी योजनेची सुरवात झाली .त्यात कालौघात हवे तितके बदल झाले .परंतु मजुरांची परिस्थिती आहे तशीच आहे .रोहयो मजुरांच्या मागणीनुसार वर्षभरात शासनाने रोहयो मजुरांना मागेल तितके काम देणे बंधनकारक केले आहे .असे असतांनाही स्थलांतर होतेच कसे? यावर कोणत्याही स्तरावरुन समिक्षा केली जात नाही हे मजुरांचे दुर्दैव आहे.

# तोतया फॉरेस्ट अधिकाऱ्याला लाच स्वीकारताना अटक

ठाणे : अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी आणि माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करून खंडणी म्हणून ५ लाख ६० हजार स्वीकारताना एका बोगस फॉरेस्ट अधिकाऱ्याला रंगेहाथ अटक करण्यात आली. त्याच्याकडून खंडणीची रक्कम आणि तीन मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. पोलीस अधिक तपास करत आहेत.



बांधकाम व्यावसायिकांकडे फॉरेस्ट अधिकारी असल्याची बतावणी करत बांधकामाची वारंवार तक्रार करून सेटलमेंट करत पैसे घेण्याचा या तोतया फॉरेस्ट अधिकाऱ्याचा डाव होता.प्रसादकुमार उत्तम भालेराव (३३) असे त्याचे नाव असून त्याला खंडणी विरोधी पथक तसेच विशेष कृती दलाच्या पथकाने सापळा रचून अटक केली.

पोलीस पथकाने अटक प्रसादकुमार भालेराव याच्या अंगझडतीत तीन मोबाईल आणि खंडणीची रक्कम ५ लाख ६० हजार हस्तगत केली. त्याच्या विरोधात डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवण्याची गरज!



# सततच्या वणव्यामुळे पशुपक्ष्यांचा अधिवास धोक्यात?

■ **मुरबाड**: मुरबाड तालुक्याला मागील काही दिवसांपासून वणव्यांचे ग्रहण लागले असून दिवसाआड तालुक्याच्या चोहोबाजूंनी कुठे ना कुठे वणवा भडकत आहे. हे वणवे लागतात की, लावले जातात या चर्चेत हे वणवे मानवनिर्मित असल्याने वणव्यांमुळे पशुपक्ष्यांचा अधिवास धोक्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटापासून सह्याद्री पर्वताचा परिसर ऑक्सीजनची नळकांडी समजल्या जाणाऱ्या या परिसरातील जंगलांना मागील काही दिवसांपासून लागणाऱ्या वणव्यांमुळे वनसंपदेची अपरिमित हानी होत आहे. यामध्ये मागील पावसाळ्यात नवीन अंकुरित धारणेच्या रोपटयांची व फुटव्यांची राख होत आहे. तर फळधारणेनंतर तयार झालेली नैसर्गिक बीजे जळून खाक होत आहेत. तसेच अनेक वर्षांचे वृक्ष आगीच्या दाहाने होरपळून जात आहेत. यामुळे एकूणच पर्यावरणाची मोठी हानी होत आहे.वणव्याच्या घटना समजताच वन खाते जरी तत्काळ प्रयत्न करत असले तरी आता सुरु झालेल्या तीव्र उन्हामुळे सुकलेला पालापाचोळा मोठया ज्वाला धारण करत आहेत. तसेच तीव्र उतार चढाव असल्याने वणव्याच्या ठिकाणी पोहचताना त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळ्यात वणवा लागण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या आगीत अनेक वनौषधी, सरपटणारे प्राणी, किटक, तृणभक्षी प्राणी, त्यांची अंडी, घरटी जळून खाक होत असून, अंडी व घरटी जळाल्याने या आगीत जीव जात आहे.



> सह्याद्रीच्या डोंगरकपारी गावाकडील जंगलात उन्हाळ्यात वणवा लागण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. वणवे टाळण्यासाठी वन विभागाने डोंगर परिसरात लोकांच्या जनजागृतीची मोहीम प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे . वणवे रोखण्यासाठी स्थानिक मंडळांनी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे .भविष्यात वन विभागाने असे नाही केले तर जंगल नष्ट होईल व उन्हाळ्यात जनावरांना चारा शिल्लक राहणार नाही अशी भीती व्यक्त केली जात आहे.
>
> रघुनाथ खाकर, अध्यक्ष मुरबाड तालुका सह्याद्री आदिवासी म.ठाकूर संघटना